उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदे महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासकीय शाखा), चाळणी परीक्षा-2013
परीक्षा दिनांक - 30/03/2014

# A

**2013** CODE : **XO3**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.**

## प्रश्नपुस्तिका

**एकूण प्रश्न : 100**

**वेळ : 1 (एक) तास** **चाळणी परीक्षा/SCREENING TEST** **एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
केंद्राची संकेताक्षरे ↑ ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्यायापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**
**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. युनोने 2013 हे वर्ष __________ म्हणून घोषित केले आहे.
   (1) बालिका वर्ष (2) युवक वर्ष (3) सहकार वर्ष (4) जलसहकार्य वर्ष

2. खालील पैकी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदी प्रथमच कोणत्या महिलेची निवड झाली आहे ?
   (1) शिक्षा शर्मा (2) चंदा कोचर (3) अरुंधती भट्टाचार्य (4) शुभलक्ष्मी पानसे

3. 2013 वर्षातील भारताच्या 'मंगळ मोहिमेमध्ये' कोण, कोण सहभागी आहेत ?
   (अ) एस. के. शिवकुमार (ब) एम. एन्नादुराई
   (क) पी. कुन्हीकृष्णन (ड) रघुनाथ माशेलकर
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (अ), (ब), (क) (2) फक्त (ब), (क), (ड)
   (3) फक्त (क), (ड), (अ) (4) फक्त (ड), (अ), (ब)

4. जगामध्ये कोण, कोणत्या देशांनी 'सक्तीचे मतदान' स्वीकारले आहे ?
   (अ) आस्ट्रेलिया (ब) बेल्जियम (क) अर्जेंटीना (ड) दक्षिण कोरीया
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (ब), (क), (ड) (2) फक्त (क), (ड), (अ)
   (3) फक्त (ड), (अ), (ब) (4) फक्त (अ), (ब), (क)

5. संयुक्त राष्ट्रसंघाच्या रासायनिक शस्त्र बंदी करारावर खालीलपैकी कोण, कोणत्या देशांनी स्वाक्षरी केली नाही ?
   (अ) सिरीया (ब) उत्तर कोरीया (क) इजिप्त (ड) पाकिस्तान
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (ब), (क), (ड) (2) फक्त (क), (ड), (अ)
   (3) फक्त (ड), (अ), (ब) (4) फक्त (अ), (ब), (क)

6. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा 2013 मध्ये खालील कोणत्या बाबीचा समावेश नाही ?
   (1) तांदूळ (2) गहू (3) भरड धान्ये (4) डाळी

7. निवडणूकीमध्ये (NOTA - None of the above) 'वरीलपैकी एक ही नाही' हा पर्याय कोण, कोणत्या देशांमध्ये उपलब्ध आहे ?
   (अ) कोलंबिया (ब) युक्रेन (क) ब्रिटेन (ड) नेदरलॅण्ड
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (अ), (ब), (क) (2) फक्त (ब), (क), (ड)
   (3) फक्त (क), (ड), (अ) (4) फक्त (ड), (अ), (ब)

**कच्च्या कामासाठी जागा**

8. थेट विदेश गुंतवणूकीत महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आहे. देशातील एकूण प्रस्तावित थेट विदेशी गुंतवणूकीच्या किती टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे?

(1) 21% (2) 22% (3) 23% (4) 24%

9. 2013 च्या सर्वोच्च प्रतिष्ठेच्या 'राजीव गांधी खेलरत्न' पुरस्कार नुकताच कोणाला प्रदान करण्यांत आला?

(1) विराट कोहली (2) गगन नारंग (3) रोंजन सोधी (4) पी.व्ही. सिंधू

10. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेबाबत खालील विधाने विचारात घ्या :

(अ) 1 जुलै 2012 पासून संपूर्ण महाराष्ट्रात ही योजना कार्यान्वित केली गेली.

(ब) लाभार्थी - दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबे.

(क) लाभार्थी - दारिद्र्य रेषेवरील परंतु वार्षिक उत्पन्न 1 लाखापेक्षा कमी अशी सर्व कुटुंबे.

(ड) प्रतिवर्षी प्रति कुटुंब रु. 1.50 लाख इतके विमा संरक्षण.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत?

(1) (अ) आणि (ब) (2) (ब) आणि (क)

(3) वरील सर्व (4) (ब), (क) आणि (ड)

11. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालील कोणते राजकीय पक्ष स्थापन करुन निवडणुकांमध्ये उमेदवार उभे केले?

(अ) बहिष्कृत हितकारिणी सभा (ब) रिपब्लिकन पक्ष

(क) स्वतंत्र मजुर पक्ष (ड) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) फक्त (2) (अ) आणि (ब) फक्त

(3) (अ), (ब) आणि (ड) (4) (क) आणि (ड)

12. 1773 मध्ये ब्रिटिश सरकारने 'रेग्युलेटिंग ॲक्ट' भारतात लागू केला त्यानुसार :

(अ) सर्वच जनतेला मतदानाचा अधिकार मिळाला.

(ब) गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलची सदस्य संख्या 04 झाली.

(क) मुंबई व मद्रासच्या गव्हर्नरांना युध्द करण्याचा अधिकार राहिला नाही.

(ड) दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्यात आले.

वरीलपैकी कोणते विधान/कोणती विधाने **बरोबर** आहे/आहेत?

(1) (अ) फक्त (2) (अ) आणि (ब) फक्त

(3) (ब) आणि (क) फक्त (4) (ब), (क) आणि (ड)

**कच्च्या कामासाठी जागा**

13. 'दत्तक वारस नामंजूर' या तत्वानुसार लॉर्ड डलहौसीने महाराष्ट्रातील कोणते संस्थान सर्वात प्रथम खालसा केले ?

(1) नागपूर (2) सातारा (3) कोल्हापूर (4) सावंतवाडी

---

14. पुढील दोन विधानांवर विचार करा.

(अ) आनंद वाघमारे यांनी निजामाविरुद्ध मराठवाड्यात जनजागृती औरंगाबाद येथून 'मराठवाडा' साप्ताहिक प्रसिद्ध करुन केली.

(ब) हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाची सुरुवात हैद्राबाद शहरातील वंदे मातरम् सत्याग्रहाने/चळवळीने झाली. आता सांगा की,

(1) विधान (अ) बरोबर आहे परंतु (ब) चूक आहे.

(2) विधान (ब) बरोबर आहे परंतु (अ) चूक आहे.

(3) (अ) व (ब) दोन्ही विधाने चूक आहेत.

(4) (अ) व (ब) दोन्ही विधाने बरोबर आहेत.

---

15. भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार इंग्रजांनी संस्थानिकांबाबत केलेली तरतूद म्हणजे :

(अ) सर्व संस्थानिकांनी आपले राज्य भारतातच सामील करावे.

(ब) संस्थानिकांचे राज्य आपोआपच नष्ट होईल.

(क) संस्थानिकांनी भारत किंवा पाकिस्तानमध्ये सामील व्हावे अगर स्वतंत्र राहावे.

(ड) इंग्रजांनी संस्थानिकांशी केलेले सर्व करार रद्द होतील.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (ब) आणि (क) फक्त

(3) (क) आणि (ड) फक्त (4) (अ), (ब) आणि (ड)

---

16. 1757 च्या प्लासीच्या युध्दात इंग्रजांना विजय मिळाला कारण :

(अ) बंगालचा नबाब शेजारील प्रांतात गेला होता.

(ब) इंग्रजांना मोठी मदत मीर कासीम ने केली होती.

(क) नबाबाचा सेनापती मीर जाफर हा इंग्रजांना फितूर झाला होता.

(ड) नबाबाच्या दरबारात भ्रष्टाचार व गोंधळ निर्माण झाला होता.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (अ), (ब) आणि (क)

(3) (क) आणि (ड) फक्त (4) (अ), (ब), (क) आणि (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

17. वर्धा शिक्षण योजना म्हणजेच :
(1) खाजगी शिक्षण योजना
(2) मूलभूत शिक्षण योजना
(3) उच्च शिक्षण योजना
(4) ग्रामीण शिक्षण योजना

18. ग.ज.लॉर्ड वेलस्लीने भारतात 'तैनाती फौज' पध्दत सुरू केली ज्या राजांनी ही फौज स्वीकारली त्यांना ________.
(अ) कंपनीचे अधिपत्य मान्य करावे लागे.
(ब) कंपनीने आपला प्रदेश बहाल केला.
(क) कंपनीच्या सैनिकांचा खर्च करावा लागे.
(ड) कंपनीने बक्षिसे देऊन पदव्या बहाल केल्या.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) आणि (ब) फक्त
(2) (ब) आणि (क) फक्त
(3) (अ) आणि (क) फक्त
(4) (अ), (क) आणि (ड)

19. सन 1799 मध्ये रणजितसिंगाने लाहोर जिंकून आपले राज्य स्थापन केले. राजा रणजितसिंग बाबत कोणती विधाने **बरोबर** आहेत ?
(अ) तो एक महत्वाकांक्षी राजा होता.
(ब) त्याने युरोपीयन पध्दतीने लष्कर तयार केले.
(क) इंग्रज, नेपाळ व अफगाणिस्तानचे राजे हे रणजितसिंगाचे शत्रू होते.
(ड) लॉर्ड वेलस्ली याने रणजितसिंगाबरोबर करार केला.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) आणि (ब) फक्त
(2) (क) आणि (ड) फक्त
(3) फक्त (अ), (ब), (क)
(4) (अ), (ब), (क) आणि (ड)

20. हैद्राबादच्या निजामाने लॉर्ड वेलस्ली बरोबर करार करून तैनाती फौज स्वीकारली कारण :
(अ) निजामाच्या संस्थानाला टिपू सुलतानापासून धोका होता.
(ब) निजामाला फ्रेंचांची भिती वाटत होती.
(क) निजामाला मराठा सत्तेकडून धोका होता.
(ड) निजामाचे सामर्थ्य कमी होते.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) व (क) फक्त
(2) (ब) फक्त
(3) (अ), (क) व (ड) फक्त
(4) (क) फक्त

21. भारतात जनहित याचिकेची सुरवात ________ झाली.
(1) घटना दुरुस्तीद्वारे
(2) न्यायालयीन पुढाकाराने
(3) राजकीय पक्षांमार्फत
(4) संसदेच्या कायद्याने

**कच्च्या कामासाठी जागा**

22. उत्तर भारतीय पठाराच्या उपपठारांचा पश्चिमेकडून पूर्वेकडे असा योग्य स्थान क्रम खालीलपैकी कोणता आहे?
    (1) मारवाड-मेवाड-माळवा-बुंदेलखंड-छोटा नागपूर
    (2) माळवा-मेवाड-मारवाड-छोटा नागपूर-बुंदेलखंड
    (3) मेवाड-मारवाड-माळवा-बुंदेलखंड-छोटा नागपूर
    (4) छोटा नागपूर-बुंदेलखंड-मारवाड-मेवाड-माळवा

23. भारतीय उपखंडातील आवर्तामध्ये वाऱ्याची दिशा खालीलपैकी कशी असते?
    (1) घड्याळाच्या काट्याच्या दिशेने
    (2) घड्याळाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने
    (3) पश्चिमेकडून पूर्वेकडे
    (4) उत्तरेकडून दक्षिणेकडे

24. खालीलपैकी कोणते राज्य भारतातील पहिले कार्बनमुक्त राज्य असेल?
    (1) महाराष्ट्र (2) गुजरात (3) हिमाचल प्रदेश (4) मध्य प्रदेश

25. पृथ्वीवरील विविध भू-हालचाली घडून येण्यासाठी आवश्यक ती शक्ती व घडामोडींचे मुख्य उगमस्थान खालीलपैकी कोणत्या थरात असते?
    (1) सीमा (2) प्रावरण (3) बाह्य गाभा (4) अंतर्गत गाभा

26. खालील विधाने पहा :
    (अ) 1 मे 1982 रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन लातूर हा नवीन जिल्हा करण्यात आला.
    (ब) उस्मानाबाद जिल्ह्यात नळदुर्ग किल्ला आहे.

    **पर्यायी उत्तरे :**
    (1) विधाने (अ) आणि (ब) असत्य आहेत.
    (2) विधान (अ) असत्य आणि विधान (ब) सत्य आहे.
    (3) विधाने (अ) आणि (ब) सत्य आहेत.
    (4) विधान (अ) सत्य आणि विधान (ब) असत्य आहे.

27. महाराष्ट्रात संमिश्र वसाहतीमध्ये काही वेळा एकाच नावाने ओळखली जाणारी जोड-खेडी असतात. त्याबाबत पुढील दोन विधाने पहा :
    (a) यातील लहान खेड्यास ''खुर्द'' म्हणतात.
    (b) मोठ्या खेड्यास ''बुद्रुक'' म्हणतात.

    **पर्यायी उत्तरे :**
    (1) (a) बरोबर (b) चूक
    (2) (b) बरोबर (a) चूक
    (3) दोन्ही बरोबर
    (4) दोन्ही चूक

**कच्च्या कामासाठी जागा**

28. खालीलपैकी कोणत्या लोकसंख्या गटातील खेड्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक आहे ?

(1) 200 पेक्षा कमी लोकसंख्या
(2) 201 ते 2000 लोकसंख्या
(3) 2001 ते 5000 लोकसंख्या
(4) 5000 पेक्षा जास्त लोकसंख्या

---

29. सुर्यापासून पृथ्वीच्या दर चौरस सेंटिमीटर क्षेत्रफळाच्या भागात प्रत्येक मिनीटाला मिळणाऱ्या उष्णतेचे प्रमाण पुढीलपैकी कोणते आहे ?

(1) 2.94 कॅलरी
(2) 1.94 कॅलरी
(3) 0.94 कॅलरी
(4) 3.94 कॅलरी

---

30. चांदोली राष्ट्रीय उद्यान __________ म्हणून प्रसिद्ध आहे.

(1) वन्य प्राण्यांचा स्वर्ग
(2) पक्ष्यांचा स्वर्ग
(3) फुलपाखरांचा स्वर्ग
(4) सरपटणाऱ्या प्राण्यांचा स्वर्ग

---

31. कोणत्या दिवशी फेडरल कोर्ट ऑफ इंडियाच्या जागी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली ?

(1) 15 ऑगस्ट 1947
(2) 26 जानेवारी 1950
(3) 14 जानेवारी 1935
(4) 26 नोव्हेंबर 1949

---

32. नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान **बरोबर नाही** ?

(1) या पदास घटनात्मक दर्जा आहे.
(2) त्यांची नेमणूक राष्ट्रपतीद्वारे होते.
(3) त्यांचा कार्यकाळ 5 वर्षे किंवा वयाची 62 वर्षे पूर्ण होईपर्यंत असतो.
(4) संसदेच्या सल्ल्याशिवाय राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकत नाहीत.

---

33. आपल्या पाच वर्षाच्या शासनकाळात तीन पंतप्रधान पंडीत नेहरु, लाल बहादूर शास्त्री व इंदीरा गांधी यांच्या सोबत राष्ट्रपती म्हणून कोणी काम केले ?

(1) डॉ. राजेंद्र प्रसाद
(2) डॉ. राधाकृष्णन्
(3) व्ही.व्ही. गिरी
(4) डॉ. झाकीर हुसेन

---

34. खालीलपैकी कोणत्या समित्या संसदीय समित्या आहेत ?

(अ) नियम समिती
(ब) अंदाज समिती
(क) सभासदांच्या अनुपस्थितीबाबत समिती
(ड) नियोजन समिती

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) फक्त
(2) (अ), (ब), (क)
(3) (क), (ड)
(4) (अ), (ब), (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

35. लोकायुक्ताबाबत योग्य विधाने ओळखा.

(अ) लोकायुक्त पदाची निर्मिती करणारे पहिले राज्य महाराष्ट्र होय.

(ब) महाराष्ट्राने 1971 मध्ये हे पद संमत केले.

(क) लोकायुक्तांची नेमणूक राज्यपाल करतात.

(ड) त्यांचा कार्यकाळ 5 वर्षे असतो.

पर्यायी उत्तरे :

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (अ) आणि (क) फक्त

(3) (ब) आणि (ड) फक्त (4) वरील सर्व

36. भारतात वित्त आयोगाविषयी अचूक विधाने ओळखा.

(अ) वित्त आयोगाची स्थापना घटनाबाह्य आहे.

(ब) वित्त आयोगाचा कार्यकाळ 5 वर्षांचा असतो.

(क) वित्त आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक पंतप्रधान करतात.

(ड) 14 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. वाय.व्ही. रेड्डी हे आहेत.

पर्यायी उत्तरे :

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (अ), (ब) आणि (क)

(3) (ब) आणि (ड) (4) (अ) आणि (क) फक्त

37. भारतात मतदानाचा अधिकार मिळण्याकरिता वयोमर्यादा 21 वर्षावरून 18 वर्षे कोणत्या घटनादुरुस्तीनुसार केली आहे?

(1) 42 वी घटनादुरुस्ती 1976 (2) 44 वी घटनादुरुस्ती 1978

(3) 61 वी घटनादुरुस्ती 1989 (4) 56 वी घटनादुरुस्ती 1987

38. उपराष्ट्रपती विषयी अचूक विधाने ओळखा.

(अ) उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात.

(ब) भारताचे पहिले राज्यसभेचे सभापती डॉ. राजेंद्रप्रसाद हे होते.

(क) उपराष्ट्रपती होण्यासाठी वयोमर्यादा किमान 30 वर्षे असावी.

(ड) त्यांची राज्यसभेतून निवडून येण्याची पात्रता असावी.

पर्यायी उत्तरे :

(1) (अ) आणि (क) फक्त (2) (अ), (ब) आणि (क) फक्त

(3) (अ) आणि (ड) फक्त (4) वरील सर्व

कच्च्या कामासाठी जागा

39. केंद्रीय दक्षता आयोगाबाबत योग्य विधाने ओळखा.

(अ) केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना राज्यघटनेच्या नियमानुसार करण्यात आली.

(ब) केंद्रीय दक्षता आयोगाच्या स्थापनेसाठी संतनाम समितीची स्थापना करण्यात आली.

(क) केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना 1964 मध्ये झाली.

(ड) या आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक पंतप्रधान करतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) फक्त (2) (ब) आणि (क) फक्त

(3) (ब), (क) आणि (ड) फक्त (4) वरील सर्व

---

40. महाराष्ट्रातील विधान परिषदेबद्दल अचूक विधाने ओळखा.

(अ) भारतीय राज्यघटनेच्या कलम 169 नुसार महाराष्ट्र विधान परिषद स्थापन करण्यात आली.

(ब) महाराष्ट्रात विधान परिषदेत 288 सदस्य आहेत.

(क) विधान परिषदेचे पहिले सभापती वि.स.पागे हे होते.

(ड) सध्याचे विधानपरिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख हे आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) फक्त (2) (ब) व (क) फक्त

(3) (ब), (क) व (ड) (4) (अ), (क) व (ड)

---

41. 2011 नुसार लघुउद्योगांची भांडवल गुंतवणूक मर्यादा किती कोटी रुपये होती ?

(1) 2 कोटी रुपये (2) 3 कोटी रुपये (3) 4 कोटी रुपये (4) 5 कोटी रुपये

---

42. भारत जागतिक व्यापार संघटनेचे ________ सदस्य राष्ट्र आहे.

(1) तात्पुरते (2) कायम (3) संस्थापक (4) नाममात्र

---

43. "महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश 2013" ची ठळक वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

(अ) संस्थांच्या व्यवस्थापकीय समितीचा कार्यकाळ 5 वर्षासाठी निश्चित.

(ब) संस्थांच्या व्यवस्थापकीय समितीत अनुसूचित जाती/जमाती व महिलांना योग्य प्रतिनिधीत्व.

(क) थकबाकीवर सभासदांना नोटीस बजावण्याचे अधिकार गृहनिर्माण संस्थांना प्रदान.

(ड) संस्थांवर प्रशासक नेमण्याचा राज्यशासनाचा अधिकार.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) (2) (ब), (क) आणि (ड)

(3) (अ), (ब) आणि (ड) (4) (अ) आणि (क) फक्त

---

**कच्च्या कामासाठी जागा**

44. लिंग सक्षमीकरण मापन (GEM) यासाठी कोणत्या बाबी विचारात घेतल्या जातात ?

(अ) महिलांचा आर्थिक सहभाग
(ब) महिलांचा शिक्षणातील सहभाग
(क) महिलांचा राजकीय सहभाग
(ड) महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ड) फक्त
(2) (अ), (ब) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) (अ) आणि (क) फक्त

---

45. ग्रामीण भागात मुलभूत सोयी आणि पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या 'भारत निर्माण' कार्यक्रमात कोणत्या घटकांचा समावेश आहे ?

(अ) विद्युतीकरण
(ब) शिक्षण
(क) रस्ते
(ड) पिण्याचे पाणी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (ड)
(2) (अ) आणि (क) फक्त
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (अ), (क) आणि (ड)

---

46. नोव्हेंबर, 2012 पर्यंत महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त विशेष आर्थिक क्षेत्रामधील सर्वात जास्त प्रकल्प ________ क्षेत्रातील आहेत.

(1) कोंकण
(2) पुणे
(3) औरंगाबाद
(4) अमरावती

---

47. 2011-12 मध्ये भारतातील कोणत्या राज्यात दरडोई उत्पन्नातील वाढ सर्वाधिक आहे ?

(1) गुजरात
(2) बिहार
(3) महाराष्ट्र
(4) कर्नाटक

---

48. 2010 - 11 मध्ये भारताची आयात सर्वाधिक ________ या देशाकडून झालेली आहे.

(1) इराण
(2) सौदी अरेबिया
(3) यु.एस.ए.
(4) चीन

---

49. नाबार्ड चे अधिकृत भांडवल ________ कोटी रुपये आणि वसूल भांडवल ________ कोटी रुपये आहे.

(1) 500 कोटी रु. आणि 100 कोटी रुपये
(2) 400 कोटी रु. आणि 50 कोटी रुपये
(3) 300 कोटी रु. आणि 30 कोटी रुपये
(4) वरीलपैकी नाही

---

50. खालीलपैकी कोणत्या उद्योगांचा नवरत्न उद्योगांमध्ये समावेश करण्यात आलेला आहे ?

(1) भारत हेवी इलेक्ट्रिक लिमिटेड.
(2) भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड.
(3) महानगर टेलिफोन निगम लिमिटेड.
(4) वरील सर्व.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

51. IPV4 प्रमाणे प्रत्येक संगणकास दिला जाणारा IP address ________ बीट (Bit) चा असतो :

(1) 16 बीट (2) 32 बीट (3) 64 बीट (4) 128 बीट

---

52. फुग्यांचा उपयोग करून इंटरनेट उपलब्ध होण्यासाठी प्रायोगिक तत्वावर Google ने ________ उपक्रम चालु केला आहे, ज्यामुळे ग्रामीण आणि अती दुर्गम प्रदेशात इंटरनेटशी जोडणी शक्य होते.

(1) Project loon (प्रोजेक्ट लुन) (2) Project baloon (प्रोजेक्ट बलुन)

(3) Project Parachute (प्रोजेक्ट पॅरॅशुट) (4) Project Butterfly (प्रोजेक्ट बटरफ्लाय)

---

53. I.T. Act 2000 नुसार, जी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या मूळ मजकुरात (Source document) हेतुपुरस्सर फेरफार अथवा बदल अथवा नुकसान घडवून आणते, त्या व्यक्तीस खालील पैकी कोणती शिक्षा होऊ शकते ?

(1) 3 वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा 2 लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही

(2) 3 वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा 1 लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही

(3) 2 वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा 2 लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही

(4) 2 वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा 1 लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही

---

54. TCP/IP या संज्ञेमधील TCP म्हणजे ________.

(1) टेलीकम्युनिकेशन प्रोग्रॅम (2) टेक्नॉलॉजी कंट्रोल प्रोटोकॉल

(3) ट्रान्समिशन कंट्रोल प्रोग्रॅम (4) ट्रान्समिशन कंट्रोल प्रोटोकॉल

---

55. The Community Information Centre (कम्युनिटी माहिती केंद्रा) तर्फे मूलभूत सेवांच्या जोडीने खालील पैकी कोणत्या सुविधा पुरवल्या जातात ?

(अ) जन्म व मृत्यु नोंदणी

(ब) शेती संबंधित मालाच्या विनिमयाचे दर

(क) शैक्षणिक संधींविषयी माहिती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब) फक्त (2) (ब) आणि (क) फक्त

(3) (अ) आणि (क) फक्त (4) (अ), (ब) आणि (क)

---

56. माहितीचा अधिकार कायद्याखाली माहिती मिळण्यासाठी सर्वसाधारण परिस्थितीत करण्यात आलेल्या अर्जाचा निपटारा अर्ज मिळाल्यापासून खालील कालावधीत करावयाचा असतो :

(अ) पाच दिवसाच्या आत (ब) सात दिवसाच्या आत

(क) तीस दिवसांच्या आत (ड) तीन महिन्याच्या आत

वरीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) (अ) फक्त (2) (ड) फक्त (3) (क) फक्त (4) (ब) फक्त

---

**कच्च्या कामासाठी जागा**

57. माहितीच्या अधिकाराखाली एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे करण्यात आलेला अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावयाचा असल्यास __________ पेक्षा जास्त विलंब करता येणार नाही.

(1) 20 दिवस (2) 15 दिवस (3) 10 दिवस (4) 5 दिवस

---

58. राज्य जन माहिती अधिकाऱ्याने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचे अर्ज स्वीकारण्यास नकार दिला असल्यास, व ही कृती वाजवी नसल्याचे शाबीत झाल्यास, त्या अधिकाऱ्यास, तो अर्ज स्वीकारण्यापर्यंत प्रत्येक दिवसाला __________ इतकी शास्ती लावता येईल.

(1) रुपये 300 (2) रुपये 250 (3) रुपये 200 (4) रुपये 150

---

59. माहितीचा अधिकार कायद्याखाली माहिती मिळण्यासाठी अर्जदार खालील भाषांमध्ये अर्ज करू शकतो :

(अ) कुठलीही भाषा
(ब) इंग्रजी
(क) हिंदी
(ड) ज्या प्रदेशामध्ये अर्ज केला जात आहे त्या प्रदेशातील भाषा

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (अ) फक्त (2) (ब), (क), (ड) (3) (ड) फक्त (4) (ब) व (क) फक्त

---

60. माहितीचा अधिकार कायदा 2005 ला राष्ट्रपतींकडून कोणत्या तारखेस अनुमती मिळाली ?

(1) 15 मार्च 2005 (2) 29 ऑगस्ट 2005 (3) 15 जून 2005 (4) 30 ऑक्टोबर 2005

---

61. मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 नुसार विशेष सरकारी वकील होण्यासाठी कोणती अट आहे ?

(1) 5 वर्ष वकीलीचा अनुभव
(2) 3 वर्ष वकीलीचा अनुभव
(3) 6 वर्ष वकीलीचा अनुभव
(4) 7 वर्ष वकीलीचा अनुभव

---

62. मानव अधिकार संरक्षण अधिनियम, 1993 च्या कलम 30 अन्वये __________ हे, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाच्या सहमतीने प्रत्येक जिल्ह्यात एक कोर्ट ऑफ सेशनस्‌ला 'मानवाधिकार न्यायालय' म्हणून अधिसूचनेद्वारे घोषीत करू शकेल.

(1) भारताची संसद (2) राज्य सरकार (3) सर्वोच्च न्यायालय (4) उच्च न्यायालय

---

63. हुंडा प्रतिबंध कायदा, 1961 च्या कलम 3 अन्वये हुंडा घेणाऱ्या अथवा घेण्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीस __________ वर्षे पेक्षा कमी नाही इतकी कारावासाची व रुपये __________ अथवा हुंड्याची रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल अशा द्रव्य दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

(1) 5/ पंधरा हजार (2) 6/ दहा हजार (3) 2/ पाच हजार (4) 10/ एक लाख

---

**कच्च्या कामासाठी जागा**

64. एखाद्या व्यक्तीस अस्पृश्यतेच्या आधारावर सार्वजनिक दवाखान्यात प्रवेश नाकारणाऱ्या व्यक्तीस जास्तीत जास्त ________ महिने कारावास व ________ रुपये द्रव्य दंडाची तरतूद नागरी हक्क संरक्षण कायदा, 1955 अन्वये केली आहे.

(1) 8 ; 1500 (2) 6 ; 500 (3) 4 ; 500 (4) 3 ; 1000

---

65. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्याबाबत नियम 2006 मधील कलम 3 मध्ये संरक्षण अधिकाऱ्याचा कालावधी किती वर्षाचा दिलेला आहे ?

(1) किमान तीन वर्ष (2) किमान चार वर्ष
(3) किमान पाच वर्ष (4) वरील पैकी कुठलेही नाही

---

66. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम 2005 मधील कलम 29 नुसार अपील कोणाकडे व किती दिवसात करावे ?

(1) हायकोर्ट व 60 दिवसात (2) सत्र न्यायालय व 60 दिवसात
(3) सत्र न्यायालय व 30 दिवसात (4) सत्र न्यायालय व 45 दिवसात

---

67. मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 नुसार मानवी हक्क कोणते आहेत ?

(अ) जीवन व स्वातंत्र्याचे हक्क
(ब) जीवन व समता याविषयीचे हक्क
(क) समता व प्रतिष्ठा याविषयीचे हक्क

वरीलपैकी कोणते/कोणती वाक्य/वाक्ये **बरोबर** आहे/आहेत ?

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)
(3) (अ) आणि (ब) फक्त (4) (अ), (ब) आणि (क)

---

68. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या साधारण सभेने 'मानवी अधिकारांचा जागतिक जाहीरनामा' ________ रोजी संमत केला.

(1) 27 डिसेंबर, 1947 (2) 10 जानेवारी, 1950
(3) 10 डिसेंबर, 1948 (4) 27 ऑगस्ट, 1949

---

69. राज्य मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षांचा कार्यकाळ पदभार स्वीकारल्यापासून ________ वर्षे किंवा वयाची ________ वर्षे जे आधी पूर्ण होईल तो :

(1) 10 ; 70 (2) 6 ; 65 (3) 5 ; 60 (4) 5 ; 70

---

70. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम महाराष्ट्र राज्याच्या शासन निर्णयान्वये ________ पासून सुरू करण्यात आली आहे.

(1) 26 जानेवारी 2009 (2) 15 ऑगस्ट 2009
(3) 26 जानेवारी 2007 (4) 15 ऑगस्ट 2007

---

**कच्च्या कामासाठी जागा**

71. विजेच्या बिलावरील " एक यूनिट" हे विद्युत शक्तीचे एकक आहे. खालीलपैकी योग्य पर्याय शोधा.

(अ) एक युनिट $= 1$ KWh
(ब) एक युनिट $= 3.6 \times 10^6$ ज्यूल
(क) एक युनिट $= 3.6 \times 10^6$ वॅट सेकंद
(ड) एक युनिट $= 1$ वॅट

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब), (क) आणि (ड)
(2) (अ) आणि (ड)
(3) (ब) आणि (क) फक्त
(4) (अ), (ब) आणि (क)

---

72. वनस्पतीच्या खोडाच्या वाढीसाठी खालीलपैकी कोणते/कोणकोणते संप्रेरक मदत करते ?

(1) सायटोकायनिन्स व ऑक्झिन्स
(2) जिब्बरेलिन
(3) ऑक्झिन्स
(4) ॲबॅसिसिक आम्ल व सायटोकायनिन्स

---

73. इंद्रधनुष्यातील सगळे रंग एकत्र केल्यास कोणता रंग मिळेल ?

(अ) काळा (ब) पांढरा (क) हिरवा (ड) लाल

**पर्यायी उत्तरे :**

(1) (क) (2) (ड) (3) (ब) (4) (अ)

---

74. स्वयंपाकघरातील गॅस (L.P.G) हा द्रवरूपात सिलेंडरमध्ये असतो. जेव्हा तो सिलेंडरच्या बाहेर पडतो, तेंव्हा तो वायु बनतो (A) आणि बाहेर पडल्यावर जळतो (B).

(अ) प्रक्रिया (A) हा रासायनिक बदल आहे.
(ब) प्रक्रिया (B) हा रासायनिक बदल आहे.
(क) दोन्ही प्रक्रिया (A) आणि (B) रासायनिक बदल आहेत.
(ड) दोन्ही प्रक्रिया (A) आणि (B)भौतिक बदल आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) फक्त (2) (ब) फक्त (3) (ड) फक्त (4) (क) फक्त

---

75. खालीलपैकी कोणता रोग बाजरी पिकांवर पडतो ?

(1) तांबेरा (2) विलट (3) लीफ स्पॉट (4) अरगट

---

**कच्च्या कामासाठी जागा**

76. जोड्या जुळवा

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | ॲसेटिक ॲसिड | (i) | दही |
| (ब) | फॉरमिक ॲसिड | (ii) | आवळा (सायट्रस फ्रुट) |
| (क) | लॅक्टिक ॲसिड | (iii) | मुंग्यांमध्ये |
| (ड) | ॲस्कॉर्बिक ॲसिड | (iv) | व्हिनेगार |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

---

77. __________ ही चेतासंस्था हृदय, जठर, फुप्फुस इत्यादीसारख्या अनैच्छिक अवयवातील चेतानी बनलेली असते.

(1) स्वायत्त चेता संस्था
(2) मध्यवर्ती चेता संस्था
(3) परिघीय चेता संस्था
(4) यापैकी नाही

---

78. खालील जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | यकृत | (i) | सर्वात लांब (5 ते 6 मी.) |
| (ब) | जठर | (ii) | न पचलेले अन्न साठविते |
| (क) | मोठे आतडे | (iii) | पित्तरस स्रवते |
| (ड) | लहान आतडे | (iv) | हायड्रोक्लोरिक आम्ल स्रवते. |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

---

कच्च्या कामासाठी जागा

79. बहिर्वक्र भिगांचा उपयोग खालील उपकरणामध्ये होतो.

(अ) संयुक्त सुक्ष्मदर्शी (ब) दूरदर्शी

(क) कॅमेरा (ड) वाहनाचे हेडलाईटस

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) आणि (क) फक्त (2) (क) आणि (ड)

(3) फक्त (ड) (4) (अ), (ब) आणि (क)

---

80. किरणोत्सारी प्रारणांचा तीव्र संसर्ग झाल्याने 'सोमॅटीक इफेक्ट' घडून येतो आणि पेशींवर कोणता परिणाम होतो ?

(1) पांढऱ्या पेशींच्या (WBCs) गळतीमध्ये परिणामकारक वाढ होते.

(2) पांढऱ्या पेशींच्या (WBCs) गळतीमध्ये परिणामकारक घट होते.

(3) लाल पेशींच्या (RBCs) गळतीमध्ये परिणामकारक वाढ होते.

(4) लाल पेशींच्या (RBCs) गळतीमध्ये परिणामकारक घट होते.

---

81. योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | गॅल्व्हनायझिंग | (i) | पितळ |
| (ब) | विद्युत-विलेपन | (ii) | प्रेशर कुकर |
| (क) | धनाग्रीकरण | (iii) | चांदी विलेपीत चमचे |
| (ड) | संमिश्रीकरण | (iv) | चकाकणारे लोखंडी खिळे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

---

**कच्च्या कामासाठी जागा**

82. शाश्वत व आकर्षक पर्यायी इंधन म्हणून 'हायड्रोजन' हा 'फ्युएल सेल' साठी कां उपयुक्त आहे ?

(अ) वजनाने हलका, बिनविषारी व मुबलक उपलब्धी.

(ब) वनस्पतीच्या प्रकाश संश्लेषणाद्वारे हायड्रोजन निर्मिती शक्य.

(क) पाण्याच्यां विद्युत विघटनाद्वारे हायड्रोजन निर्मिती शक्य.

(ड) सहज साठवणूक करून वापरता येणे शक्य.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) फक्त
(2) (अ), (ब) व (क) फक्त
(3) (अ), (क) व (ड) फक्त
(4) सर्व बरोबर

---

83. ध्वनीच्या वेगावर खालील घटक परिणाम करतात.

(अ) जर तापमान चार पटीने वाढविले, तर ध्वनिचा वेग दोन पटीने वाढतो.

(ब) हवेतील आर्द्रता (Humidity) वाढल्यास, ध्वनिचा वेग कमी होतो.

(क) तापमान कायम ठेवून हवेचा दाब वाढविल्यास, ध्वनिचा वेग वाढतो.

(ड) हवेतील आर्द्रता (Humidity) वाढल्याने, ध्वनिचा वेग वाढतो (तापमान कायम ठेवून)

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) आणि (क) फक्त
(2) (अ) आणि (ड)
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (ब), (क) आणि (ड)

---

84. संतृप्त हायड्रोकार्बनचे सामान्य सूत्र खालीलपैकी आहे.

(1) $C_n H_{2n+2}$
(2) $C_n H_{2n}$
(3) $C_n H_{2n-2}$
(4) $C_n H_{2n+1}$

---


**कच्च्या कामासाठी जागा**

**85.** हवेच्या आर्द्रतेच्या परिणामामुळे धातूंची सावकाश झीज होते याला ________ म्हणतात.

(1) क्षरण (2) उदासिनीकरण (3) क्षपण (4) यापैकी नाही

---

**86.** खालील आकृतीमध्ये किती त्रिकोण आहेत ?



(1) 12 (2) 13 (3) 14 (4) 15

---

**87.** पुढील कोणता चिन्ह समूह विसंगत आहे ?

(1) ♓♌♍♏♐☺♋♑⌘♈♏♑ (2) ☺♑♓♌♍⌘♏♐♈♏♋♐

(3) ♓♏♌♍♑☺♑♈♏♋♐⌘ (4) ♓♌♑♍♏♐☺♑⌘♈♏♋

---

**88.** पुढील बेरजेच्या उदाहरणामध्ये अंकाऐवजी वर्णाक्षरांचा वापर केला आहे. B u s ही अनुक्रमे वर्णाक्षरे कोणत्या अंकासाठी क्रमाने वापरली आहेत ते सांगा.

| | | | |
|---|---|---|---|
| | B | u | s |
| + | B | u | s |
| + | B | u | s |
| | s | s | s |

(1) 1, 5, 8 (2) 1, 8, 5 (3) 8, 5, 1 (4) 8, 1, 5

---

**89.** एका बागेत हरीण व मोर यांच्या गटात एकूण पायांची संख्या डोक्यांच्या संख्येच्या दुप्पटीपेक्षा 16 ने जास्त आहे तर गटातील हरणांची संख्या किती ?

(1) 16 (2) 8 (3) 22 (4) 36

---

**कच्च्या कामासाठी जागा**

90. निमा नेहमी म्हणते की "आमच्या कुटुंबात आजे सासऱ्यांच्या काळापासून कुटुंबात मुलगा-मुलगी यांचे प्रमाण समान आहे. शिवाय प्रत्येक जोडप्याला मुले दोनच". आताच एका मुलीकडे निर्देश करत ती म्हणाली "ती माझ्या मुलाच्या वडीलांकडून असलेल्या आजीच्या मुलीची मुलगी आहे." तर या मुलीच्या मुलीशी निमाचे नाते काय आहे?

(1) मामी (2) भाची (3) आत्या (4) काकी

---

91. पुढे सहा विधाने दिली आहेत. त्यातील तीन विधाने निवडून त्यांचे पाच गट दिले आहेत. त्यातील तर्कसंगत विधानांचा गट (एक वा अनेक) निवडा.

(अ) सर्व परग्रहवासी मासे खातात.

(आ) जे कोणी मासे खातात ते सर्व परग्रहवासी नाहीत.

(इ) जे कोणी मासे खातात ते सर्व शाकाहारी आहेत.

(ई) सर्व परग्रहवासी मांसाहारी आहेत.

(उ) जे कोणी मासे खातात ते सर्व मांसाहारी आहेत.

(ऊ) परग्रहवासी शाकाहारी आहेत.

**गट**

(क) (आ), (इ), (उ) (ख) (अ), (आ), (उ)

(ग) (अ), (ई), (उ) (घ) (अ), (इ), (ई) (ङ) (अ), (ई), (ऊ)

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (ग) (2) (ङ) फक्त

(3) (ग) व (ङ) (4) कोणत्याही गटातील विधानात तर्कसंगती नाही.


---

**कच्च्या कामासाठी जागा**

92. अनु, निना, अँनी, जिया आणि सॅमी या मैत्रिणींचा जन्म एकाच लीप वर्षात झाला आहे. पण त्यांचे जन्म दिवस, जन्म तारखा व महिने वेगवेगळे आहेत. जर अँनीचा जन्म रविवार तारीख 19 फेब्रुवारीचा असेल तर पुढीलपैकी कोणत्या महिना व तारखेला सॅमीचा जन्म झाला असण्याची शक्यता आहे ?

(1) 30 मार्च (2) 20 ऑगस्ट (3) 25 डिसेंबर (4) 15 एप्रिल

93. पुढील रचनेतील प्रश्नचिन्हासाठी योग्य पर्याय कोणता ?




(1) E (2) V (3) R (4) Q

94. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) किमान 100 सदस्यांच्या पाठिंब्याशिवाय अविश्वासाचा ठराव मांडता येत नाही.

(ब) अविश्वासाचा ठराव केवळ लोकसभेतच मांडता येतो.

(क) दोन अविश्वासाच्या ठरावांमध्ये किमान 6 महिन्यांचा कालावधी असावा लागतो.

(ड) अविश्वासाचा ठराव केवळ विरोधी पक्ष नेत्याकडूनच मांडला जातो.


वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?





(1) (अ) आणि (ड) (2) (ब) आणि (क) फक्त

(3) (अ), (ब) आणि (क) (4) (ब), (क) आणि (ड)

**कच्च्या कामासाठी जागा**

95. मनाने आयताकृती कागदाची पुढे दाखविलेल्या निर्देशनानुसार घडी घाला व शेवटच्या आकृतीत दाखविल्याप्रमाणे तुटक रेषेवरून ती घडी कापून तो भाग वेगळा करा. ती घडी उलगडल्यानंतर तो पुढे दिलेल्या कोणत्या आकृतीसमान असेल?



(1)  (2)  (3)  (4) 

96. एका शेतात 20 गाई व 30 कोंबड्यांना घेऊन कांही गुराखी उभे आहेत. सर्वांच्या पायांची एकत्रित संख्या ही सर्वांच्या डोक्यांच्या एकत्रित संख्येपेक्षा 100 ने जास्त आहे. तर त्या ठिकाणी किती गुराखी असतील?

(1) 5 (2) 10 (3) 50 (4) 20

97. पुढील मालिकेतील विसंगत घटक निवडा.

322, 210, 154, 111, 105


(1) 111 (2) 154 (3) 210 (4) 322


98. शानने स्वत:च्या घराच्या ईशान्येला $\sqrt{2}$ एकक गाडी चालवली व रेणूला गाडीत घेतले. तेथे उजव्या बाजूला काटकोनात वळणाऱ्या रस्त्यावर तिने $\sqrt{2}$ एकक गाडी चालवली व अंजूला गाडीत घेतले. नंतर डाव्या बाजूला काटकोनात वळलेल्या रस्त्यावर तिने गाडी चालवली व $\sqrt{2}$ एकक अंतर गेल्यावर थांबून त्यांनी खेळणी खरेदी केली. त्यानंतर तिने वायव्य दिशेने गाडी चालवून $2\sqrt{2}$ एकक अंतर कापले. तर या ठिकाणाहून नेमकेपणाने स्वत:च्या घराच्या उत्तरेला असण्यासाठी तिला कमीत कमी किती एकक अंतर व कोणत्या दिशेने गाडी चालवायला हवी?

(1) 1 एकक पश्चिमेला (2) $\sqrt{2}$ वायव्येला (3) $2\sqrt{2}$ वायव्येला (4) $\sqrt{2}$ उत्तरेला

**कच्च्या कामासाठी जागा**

**99.** पुढील अंकनिर्देशित नसलेल्या आकृतींच्या मालिकेचे निरीक्षण करा व डावीकडून पाचव्या क्रमांकासाठी दिलेल्या अंकनिर्देशित पर्यायांतून आकृती निवडा.



(1)  (2)  (3)  (4) 

---

**100.** आम्ही काही मित्र सहलीला गेलो होतो. त्या ठिकाणी $20 \times 15$ चौ. मी. जागेवर भारताचा नकाशा रचलेला होता. मी मध्यप्रदेशाच्या क्षेत्रावर उभा राहिलो व पश्चिम-पूर्व क्षितिजावर पसरलेल्या हिमालयाच्या रांगा पाहू लागलो. मग मी माझ्या उजव्या हाताला 135° वळून माझ्या समोरचा प्रदेश पाहू लागलो. एवढ्यात पंजाब राज्याच्या जागेवर उभ्या असलेल्या अजीजने ही पाहा गम्मत असे म्हणत मला हाक मारली. तर मी त्याच्याकडे पाहण्यासाठी उजव्या किंवा डाव्या बाजूला दिलेल्यापैकी किती अंशातून वळणे योग्य होईल?

(1) 135° (2) 180°

(3) 225° (4) कोणत्या हाताला वळणार यावर उत्तर अवलंबून राहील

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा**

**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**Q. No. 201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदू कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**